

चेतन काकडे

# शब्द

## एक न संपणारा प्रवास

चेतन काकडे

# शब्द

एक न संपणारा प्रवास

शब्द - एक न संपणारा प्रवास

कवी : चेतन काकडे

08378950156

kakadec40@gmail.com


प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

©esahity Pratishthan®2014

या पुस्तकातील प्रत्येक ओळीवर श्री चेतन काकडे यांचे प्रताधिकार असून यातील कोणताही भाग वापरण्यासाठी त्यांच्या परवानगीची आवश्यकता आहे


शब्द माझे वेचण्याआधी
मला एक वादा द्या
नसेन अस्तित्वात मी जेव्हा
माझ्या शब्दांना तुमचा श्वास द्या



# अर्पण

ज्यांनी माझ्या आयुष्याला

एक नवीन वळण दिलं

त्या माझ्या

जिवलगआप्तांस

चेतन काकडे


वास्तवात आणि विस्तवात
तसा फ़रक काहीच नाही
वास्तव आपल्याला जगणं शिकवतं
विस्तव इतरांशी कसं वागायचं शिकवतो


खिडकीत लावलेलं मोगऱ्याचं रोपटं
मला पहाटे पहाटे जागवतं
कसं सांगू त्याला माझ्या
स्वप्नातलं गांव विसकटतं
चेतन काकडे


पावसाचा एक थेंब
अळवावर दंवासारखा विखरला
आपली जागा दुसऱ्याला देऊन
तो स्वतः मृद्गंध झाला


अहिंसा मंत्र जपणाऱ्या गांधींना
रुपयाच्या चलनावर छापलं आहे
हिंसेच्या सुपारीसाठी
त्यांना कुणी वाटलं आहे
चेतन काकडे


शब्द सापडत नाहीत म्हणून
भूतकाळात जावं लागतं
मिळत तर काहीच नाही
जे नेतो तेच हरवतं


एकटेपणात वावरणारा मी
चुकून काजवा माझ्या घरात शिरला
माझ्या चार भिंतींना मात्र
तोच जगण्याचा आधार वाटला
चेतन काकडे


शब्द- एक न संपणारा प्रवास
माणसात देव दिसेल
जर मनात श्रद्धा असेल
हात पसरून काही होणार नाही
मंदिरात न जाऊनही चालेल


पहाटे साखर झोपेत
एक गांव निजत आहे
आजही भुकंपाचे हादरणे
किल्लारीमध्ये जाणवत आहे
चेतन काकडे


कधी स्पर्श फ़ुलासारखा
कधी काट्यासारखा असतो
मैत्रीत तो आधार असतो
प्रेमात तो विश्वास असतो


भ्रष्टाचारी सत्तेशी
महागाईशी युती आहे
घोटाळ्यांशी आघाडी
फ़िक्सिंगसाठी अपक्ष आहे
चेतन काकडे



गांवच्या देवाला

कापलंय बकरु

वाट पहात बसलंय

आसुसलेलं कोकरु


मनात साठवलेली कविता
ओठांवर ठसली
माझ्याही नकळत नटली
कागदावर जाऊन बसली
चेतन काकडे



सुख शोधण्यात

बालपण माझं गेलं

आलं सुख तेव्हा


बालपण मात्र हरवलं


सुख येताना सोबत
भिती दुःखाची आणतं
दुःख वेंधळं असं की
वाट सुखाची पेरतं
चेतन काकडे



नेत्याला सत्ता भेटली, की
पैसा गिळून घेतो
खुर्ची सुटते तेव्हा
रवंथ करत बसतो


साखरझोपेतलं स्वप्न तुटतं
ते विसरता येतं
जागेपणी तुटलेलं स्वप्न
आयुष्यभर छळतं
चेतन काकडे


मंदिरातल्या निर्जीव मुर्तीला
चंदनाचा लेप
पायरीवरच्या भिकाऱ्याला
फ़ाटकाच वेश


बाभळीचं फ़ूल काटे बोचूनही
हसत जगत असतं
आयुष्य कसं जगायचं
तेच शिकवत असतं
चेतन काकडे


शब्द- एक न संपणारा प्रवास
प्रत्येक उगवणाऱ्या दिवसाला
नवलाईचा वास असतो
जन्म होताना पहिला श्वास
मृत्यू शेवटचा दिर्घ श्वास असतो

विदर्भातल्या आडगांवात जन्मलेल्या
पुण्याजवळ रहाणाऱ्या
पडेल ते काम करून
कविता आणि चित्रांमध्ये
रमणाऱ्या चेतन काकडेशी
संपर्क साधा :

kakadec40@gmail.com
08378950156



चेतन काकडे